गुरुवार, दि. १२ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १९१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

जीवनहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

# जैवविविधतेत पक्षी-प्राणी यांचे महत्त्व मोलाचे असून त्यांच्या संरक्षणासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** जैवविविधतेचे संतुलन राखण्यात पक्षी व वन्यप्राण्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून पर्यावरण संवर्धनासाठी त्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. पक्ष्यांचे अधिवास जपणे, झाडे लावणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनीकरण विभाग, वन प्रशिक्षण संस्था जालना तसेच महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जालना येथील वन प्रशिक्षण संस्था तथा जिल्हा प्रशासकीय संकुलात प्रथमच विद्यार्थी पक्षीमित्र संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना पी. एम. मिन्नू, विभागीय वन अधिकारी सुरेश वडदे, सामाजिक वनीकरण विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक अजित पुकळे, वन प्रशिक्षण संस्थेचे उपसंचालक अजय जाधव, महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र राज्य कार्यकारिणी सदस्य तथा निसर्ग कट्टा संस्थेचे संस्थापक अमोल सावंत, पक्षीमित्र संघटनेचे जिल्हा समन्वयक ज्ञानेश्वर गिराम, मयूर साबळे आणि सुभाष पारे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात वृक्षपूजन व पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली व स्व.श्री मारुती चितमपल्ली यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आले. त्यानंतर प्रधान मुख्य वनसंरक्षक सामाजिक वनीकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांनी व्हिडिओ संदेशद्वारे या कार्यक्रमास शुभेच्छापर संदेश देऊन पर्यावरण संरक्षण हे आपले संविधानिक जबाबदारी असल्याचे सांगितले.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, पर्यावरणातील संतुलन राखण्यासाठी पक्षी व प्राणी अत्यंत आवश्यक घटक आहेत. अनेक पक्षी कीड नियंत्रण, परागीभवन तसेच बियांचे प्रसारण करण्याचे महत्त्वाचे काम करतात. त्यामुळे शेती, जंगल आणि पर्यावरण या तिन्ही घटकांसाठी त्यांचे अस्तित्व आवश्यक आहे. वाढत्या शहरीकरणामुळे आणि वृक्षतोडीमुळे पक्ष्यांचे अधिवास कमी होत असून त्यांच्या संरक्षणासाठी समाजातील प्रत्येक घटकाने संवेदनशील होण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांनी पक्षीनिरीक्षणाची आवड जोपासून पर्यावरण संरक्षणाचा संदेश समाजात पोहोचवावा. पक्ष्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा प्रकारची संमेलने महत्त्वाची ठरतात. विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेम व पर्यावरणाबद्दलची जबाबदारी वाढविण्याचा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरेल.



या पक्षीमित्र संमेलनाचे प्रस्ताविक विभागीय वन अधिकारी सुरेश वडोदे यांनी करून विद्यार्थी पक्षी मित्र संमेलनाचा उद्देश सांगितला व सामाजिक वनीकरण विभागाकडून राष्ट्रीय हरित सेना व पर्यावरण शिक्षण कार्यक्रम अंतर्गत जिल्हाभरात घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमा बाबत माहिती दिली. तर महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र राज्य कार्यकारिणी सदस्य तथा निसर्ग कट्टा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अमोल सावंत यांनी महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे कार्याबाबत सांगून माझे पक्षी अभयारण्य या विषयावर स्लाइड शोद्वारे सादरीकरण केले. महाराष्ट्रात शालेय पक्षी मित्र संमेलन हा उपक्रम अमोल सावंत यांच्या संकल्पनेत सुरू करण्यात आला आहे . जालना येथील प्रसिद्ध पक्षी निरीक्षक तथा महाराष्ट्र पान २ वर

## युवा आदर्श

### खरे सत्य ...

व्यवस्थापन कुजले
दुर्गंधी सर्वत्र दर्वळे
आश्वासन तुडुंबलेले
आशा दावी दर वेळे
हेलपाटे घालू दमले
केवढा घाम निथळे
भावना लवलेश ना
कोरडे पडलेले तळे
शुभवार्ता येई कानी
वाटेकडे लागे डोळे
तपास योग्य दिशेने
विश्वास ठेवती भोळे
आरोपी धरे दोनतीन
अचंबित झाले डोळे
कोर्टच्या आवरातचं
केसेस निभ्रांत लोळे
अटकपूर्व जामीन तो
काहींना त्वरित मिळे
कापले जाती भोपळे
तयार धार धार विळे
एन्काऊंटर रे कैद्याचे
केस तिसरीकडे वळे
किंतू परंतु शंकाकिडे
कायम मना वळ वळे
खरा न्याय झाला का
सांगा कुणीतर निर्मळे
खरे सत्य खोल लपले
कायम उदरी डचमळे

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**

### SAFE Jalna अभियानाची सुरुवात

# व्यसनमुक्त जालनासाठी पोलीस-सामाजिक संस्थांचा संयुक्त निर्धार

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात वाढत्या अमली पदार्थांच्या वापराला आळा घालण्यासाठी आणि तरुण पिढीला व्यसनमुक्त जीवनाकडे वळविण्यासाठी जालना जिल्हा पोलीस दलाच्या वतीने आज दि. ११ मार्च २०२६ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना येथे " SAFE Jalna " या जनजागृती अभियानाची सुरुवात करण्यात आली. समाजातील विविध घटकांच्या सहभागातून व्यसनमुक्त जालना घडविण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

" SAFE Jalna " या अभियानांतर्गत
S – Say No to Drugs
A – Awareness in Society
F – Fight Drug Abuse
E – Empower Youth
या चार सूत्रांच्या माध्यमातून समाजात जनजागृती करून अमली पदार्थांविरोधात व्यापक लढा उभारण्याचा संकल्प करण्यात आला.

या कार्यक्रमात उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते सुनिलभाई रायठ्ठा यांनी व्यसनमुक्तीसाठी समाजातील सर्व घटकांनी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त केली. ते म्हणाले की, व्यसनाधीनतेचा प्रश्न केवळ प्रशासनाचा नसून संपूर्ण समाजाचा आहे. पोलीस प्रशासन, सामाजिक संस्था आणि जागृत नागरिक एकत्र आल्यास समाजात निश्चितच सकारात्मक बदल घडू शकतो. जर व्यसनाधीनतेवर नियंत्रण मिळवले तर परिवार, शहर, राज्य आणि देश अधिक सुरक्षित होईल. त्यासाठी मुलांसोबतच पालकांचेही समुपदेशन करणे अत्यंत आवश्यक असून त्यांनाही या अभियानात सक्रियपणे सहभागी करून घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.



जालना जिल्ह्यात व्यसनाधीनतेला आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस दलाने सामाजिक संस्था, वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिनिधी तसेच विविध शासकीय विभागांच्या समन्वयातून SAFE Jalna अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या बैठकीत जिल्ह्यातील व्यसनाधीनतेची वाढती समस्या, त्यामागील कारणे तसेच त्यावर प्रभावी उपाययोजना कोणत्या असू शकतात यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सामाजिक संस्थांनी मांडलेल्या विविध सूचनांचा पान २ वर

# १७ मार्चला ठरणार जालना मनपातील समित्यांचे नेतृत्व

### मनपा समित्यांच्या सभापती निवडीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेतील स्थायी समिती, महिला व बालकल्याण समिती तसेच इतर विशेष समित्यांच्या सभापती व उपसभापती पदांसाठी निवडणूक प्रक्रिया जाहीर करण्यात आली असून यासाठी दि. १७ मार्च २०२६ रोजी महानगरपालिकेत विशेष सभांचे आयोजन करण्यात आले आहे.

ही निवड प्रक्रिया महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१(१) व ३०(३) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व सुधारणा नियम २००८ यांच्या तरतुदीनुसार पार पाडण्यात येणार आहे.

महानगरपालिकेच्या विविध समित्यांच्या सभापती आणि उपसभापतींची निवड करण्यासाठी त्या त्या समित्यांच्या विशेष बैठका १७ मार्च रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या कालावधीत टप्प्याटप्प्याने घेण्यात येणार आहेत.

**विशेष बैठकींचे वेळापत्रक**

मनपाच्या सभागृहात खालीलप्रमाणे बैठका होणार आहेत
स्थायी समिती व महिला-बालकल्याण समिती सकाळी ११.०० ते ११.३०
स्वच्छता व आरोग्य समिती सकाळी ११.३० ते १२.००
पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती दुपारी १२.०० ते १२.३०
शिक्षण व विद्युत समिती दुपारी १२.३० ते १.००
सार्वजनिक बांधकाम समिती दुपारी १.०० ते १.३०
इतर विशेष समिती दुपारी १.३० ते २.००

या विशेष सभांमध्ये संबंधित समित्यांचे सभापती व उपसभापती पदांसाठी निवडणूक घेण्यात येणार आहे.

**नामनिर्देशनपत्रे १२ व १३ मार्चला**

या पदांसाठी इच्छुक सदस्यांना नामनिर्देशनपत्रे १२ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत वितरित करण्यात येतील. तसेच १३ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जाणार आहेत. नामनिर्देशनपत्रे नगर सचिव, नगर सचिव कार्यालय, जालना शहर महानगरपालिका येथे स्वीकारण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

**विशेष सभेतच छाननी**

दि. १७ मार्च २०२६ रोजी संबंधित समितीच्या विशेष सभेत कामकाज सुरू झाल्यानंतर पीठासीन अधिकारी नामनिर्देशनपत्रांची छाननी करणार आहेत. छाननीनंतर वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे सभागृहात जाहीर करण्यात येतील.

त्यानंतर इच्छुक उमेदवारांना नामनिर्देशनपत्र १५ मिनिटांच्या आत परत घेण्याची संधी देण्यात येणार आहे. त्यानंतर अंतिम उमेदवारांमधून सभापती व उपसभापती पदांसाठी निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाईल.

महानगरपालिकेतील महत्त्वाच्या समित्यांच्या नेतृत्वाची निवड होणार असल्यामुळे या निवडणुकीकडे शहरातील राजकीय वर्तुळांचे लक्ष लागले आहे.

# 'सामाजिक सलोखा व बंधुभाव जोपासण्याची वर्षानुवर्षाची परंपरा आजही कायम ही बाब गौरवस्पद'



**जालना । प्रतिनिधी -** हजरत जानुल्लाह शहा बाबा मियांसाब यांचा ३५४ वा उर्स पवित्र रमजान महिन्यानिमित्त रोजा इफ्तार कार्यक्रमाची अखंड परंपरा कायम ठेवल्यामुळे सामाजिक सलोखा व शांतता आणि समतेचे विचार तेवत ठेवल्याने आज सर्व जाती धर्माच्या लोकांची गर्दी उसळली आहे. असे प्रतिपादन जालना शहर महापालिकेचे उपमहापौर राजेश राऊत यांनी केले.

प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही दर्गा व्यवस्थापन समितीच्या वतीने ३५४ व्या वर्षानिमित्त बुधवार रोजी रोजा इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते एकबाल पाशा, व्यापारी महासंघाचे विनीत सहानी, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शेख मेहमूद, मिर्झा अन्वर बेग व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शेख फाईम, नगरसेवक अश्विन आंबेकर, शेख सगीर, किशोर गरदास, दिनकर घेवंदे, शेख शकील, अविनाश कव्हळे, रोहन राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना श्री राऊत म्हणाली की, पवित्र रमजान महिना शिस्तीचा आणि ईश्वराची भक्ती आणि माणुसकी जपण्याचा आहे. मनुष्याच्या दैनंदिनात या गोष्टी सातत्याने आल्यास निश्चितपणे नैतिकता जोपासल्या जाईल यात तिळ मात्र शंका नाही. यावेळी उपस्थित मान्यवरांने आपले मनोगत व्यक्त करून रमजान निमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी परवेज आलम, जावेद अली, शेख शकील, करामत भाई, शेख मुज्जमिल, हाफिज अनिस, हाफिज वसीम, पान २ वर

## संपादकीय पान

# महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री राष्ट्रीय राजकारणातले द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची आज जयंती. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए - एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले. महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीतही त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ सालच्या मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली यशवंतरावांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राचे स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. देशाचे सार्वभौमत्व धोक्यात आले अशावेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीत बोलावून त्यांची देशाच्या संरक्षणमंत्री नेमणूक केली. परकीय आक्रमणाच्या वेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या पेलली. १९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती. त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरित्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकिर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तणखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढीला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाच्या उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरित्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे, तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले. यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेख, व्यक्तिचित्रणपर लेख, प्रवासवर्णन, स्फूटलेखन, वैचारिक लेख, समीक्षात्मक लेख, पत्रलेखन भाषणे, इत्यादी स्वरूपात त्यांनी विपुल लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत हा मात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत. यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारतील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

# दक्षता घ्या, उष्माघात टाळा: जालना जिल्हा आरोग्य प्रशासनाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** यावर्षी फेब्रुवारीच्या दुसऱ्या पंधरवड्यापासूनच उन्हाचा पारा वाढू लागला आहे. वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका निर्माण होऊ नये, यासाठी नागरिकांनी योग्य ती खबरदारी आणि आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे, असे आवाहन जालना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांनी केले आहे.

प्रखर उन्हात जास्त वेळ राहिल्याने शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन उष्माघात होण्याची शक्यता असते. यामुळे जिल्हा प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत.

उष्माघाताची लक्षणे
त्वचा कोरडी पडणे आणि सतत चक्कर येणे.
अतिशय थकवा जाणवणे किंवा ताप येणे.
डोकेदुखी आणि रक्तदाब वाढणे.
मानसिक बेचैनी, अस्वस्थता आणि काही प्रसंगी बेशुद्ध पडणे.

कोणाला आहे सर्वाधिक धोका?
प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, ५ वर्षांखालील लहान मुले, कडक उन्हात काम करणारे मजूर, मधुमेह व हृदयविकार असलेले रुग्ण आणि मद्यपान करणाऱ्या व्यक्तींना उष्माघाताचा धोका सर्वाधिक असतो.

काय करावे? (बचावाचे उपाय)
भरपूर पाणी प्या: तहान लागलेली नसली तरीही दिवसातून वारंवार पाणी प्यावे.
पेयांचा वापर: ओ.आर.एस. (जलसंजीवनी), ताक, लिंबू पाणी आणि सरबत यांसारख्या द्रवपदार्थांचे सेवन वाढवावे.
पोशाख: बाहेर पडताना सुती व हलके कपडे वापरावेत. डोक्यावर टोपी, रुमाल, पायात चप्पल/बूट आणि डोळ्यांवर गॉगल्सचा वापर करावा.
कामाची वेळ: शेतीची किंवा मजुरीची कष्टाची कामे शक्यतो सकाळी लवकर किंवा सायंकाळी उशिरा करावीत.
तातडीची मदत: उष्माघाताची लक्षणे आढळल्यास रुग्णाला त्वरित जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करावे.

काय टाळावे?
दुपारी १२ ते ४ या प्रखर उन्हाच्या वेळेत बाहेर जाणे किंवा कष्टाची कामे करणे टाळावे.
जास्त तापमान असलेल्या बंद खोलीत काम करू नये.
बाहेर जाताना काळे किंवा भडक रंगाचे कपडे वापरू नयेत, कारण ते उष्णता जास्त शोषून घेतात.
महत्त्वाची टीप: गरोदर महिला, वीटभट्टी कामगार आणि कारखान्यात काम करणाऱ्यांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असेही डॉ. भुसारे यांनी पत्राद्वारे कळवले आहे.

# भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळाच्या संदर्भात उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याशी चर्चा

महाराष्ट्रातील कलाल-कलार समाजाच्या उन्नतीसाठी सरकारने आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे यासाठी संघटना प्रयत्नशील आहे.याच अनुषंगाने दिनांक १० मार्च २०२६ ला राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार यांची महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या वतीने मुंबई येथील त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी निवेदनाच्या माध्यमातून त्यांना विनंती करण्यात आली की, महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना गेल्या चार वर्षांपासून समाजाकरीता आर्थिक विकास महामंडळ स्थापन व्हावे या उद्देशाने प्रयत्नशील आहे. परंतु सरकारने कलाल- कलार समाजाकरीता भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या बाबतीत अजुनपर्यंत कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही.त्याचप्रमाणे या अगोदर स्वर्गीय अजितदादा पवार यांनाही निवेदन देण्यात आले होते आणि त्यांनी आश्वासन दिले होते की महामंडळ स्थापन करण्याचा संपूर्ण प्रयत्न करील.दादांची इच्छा पुर्तत:व्हावी या अनुषंगाने संघटनेच्या माध्यमातून राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार यांना विनंती करण्यात आली की, राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून कलाल-कलार समाजाकरीता आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या उद्देशाने आपण प्रयत्न करावे व समाजाला विकासाच्या प्रवाहात आणावे.अशी विनंती निवेदनाच्या व चर्चेच्या माध्यमातून श्रीमती सुनेत्राताई पवार यांना करण्यात आली. त्याचप्रमाणे समाजाला पारंपरिक मद्य व्यवसाय देण्यात यावा इत्यादी विविध मागण्यांच्या संदर्भात निवेदन देऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. समाजांच्या विकासासाठी आणि उन्नतीसाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या अनुषंगाने आपण सरकारच्या माध्यमातून समाजाला न्याय मिळवून द्यावा अशीही समाजाच्या वतीने मागणी करण्यात आली.यावेळी संघटनेचे अध्यक्ष सागर समुद्रवार,राज्य प्रवक्ता रमेश लांजेवार, सरचिटणीस संतोष खंबलवार,कार्याध्यक्ष रविंद्र हटवार, महिला अध्यक्षा सिमा खंबलवार, संभाजी हटेवार सह अनेक मान्यवर उपस्थित होते यामध्ये ऍड.राजेश जैस्वाल,संजय हिवाळे, संजय हटवार, भास्कर झगेकर, मनोज मेश्राम, दिपाली लोहकरे, अनिता कावरे,सिमा मेश्राम, महेंद्र शेंडे, गणेश करूटले, अनिल टाकर्डे, प्रदीप कुरवाळे, किशोर कावरे, दिपक उके, बाळासाहेब लाळे, नितिन मेश्राम, गणेश नाईक, प्रदीप गजवार, विवेक बाबुळवार,शाम करोडदे,मछेंद्र कछवे,बाबासाहेब अपशिंदे, कैलास सोनवणे प्रामुख्याने उपस्थित होते.

**रमेश लांजेवार**
**(राज्य प्रवक्ता)**
**महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना मो. नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# अपयशातून वाटचाल केल्यास यशाचे गाव नक्की सापडते

जन्माला आलेला प्रत्येक माणूस जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करताना दिसतो. प्रत्येकालाच जीवनात यशस्वी व्हावे वाटते. काही माणसे अपयश आले तरी सातत्य ठेवून यशाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करतात. ते थोड्याफार अपयशाला घाबरून यशाची वाटचाल करायची कधीच सोडून देत नाहीत. जोपर्यंत यश आपल्या पदरात पडत नाही तोपर्यंत ते सातत्याने परिश्रम व मेहनत घेऊन यशाला काबीज केल्याशिवाय स्वस्थ बसत नाहीत. त्यांचा जीवन संघर्ष यश मिळेपर्यंत निरंतर चालूच असतो. त्यांना माहीत असते की, अपयशातून वाटचाल केल्याशिवाय यशाचे ठिकाण सापडणे शक्य नाही. म्हणून ते जीवनात आलेल्या थोड्याफार अपयशाला कधीच घाबरून जात नाहीत. उलट आनंदाने अपयशाचा स्वीकार करून सातत्याने मेहनत करतात आणि यशाला काबीज करतात. काही माणसे जीवनात अपयश आले म्हणून खचून व घाबरून जातात आणि पुढील वाटचाल करणे थांबवतात. त्यांना हे माहीत नसते की, अपयशानंतर यशाची मंगलमय पहाट उगवणार आहे. अपयशानंतर यशाचे सुंदर गाव गवसणार आहे. म्हणून ते निष्क्रिय होऊन आपला जीवन संघर्ष थांबवतात. पण काहीजण थोड्याफार अपयशाला न डगमगता निरंतर आपला संघर्ष चालू ठेवतात आणि यशाला गवसणी घालूनच शांत बसतात. स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे, पोलीस भरतीची तयारी करणारे, आर्मी भरतीची तयारी करणारे, दहावी व बारावी बोर्ड परीक्षेची तयारी करणारे बरेच विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी आपले नशीब आजमावताना दिसतात. दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत नापास होणारे बरेच विद्यार्थी परीक्षेत अपयश आले म्हणून खचून जातात आणि शिक्षण शिकायचे थांबवतात. त्यांना वाटते की, आपण बोर्ड परीक्षेत नापास झाल्यामुळे आता आपले सर्व काही संपले आहे, आपण जीवनाच्या परीक्षेत अपयशी ठरलो आहोत. आता आपण शिक्षण शिकायचे थांबवले पाहिजे आणि हाताला मिळेल ते काम केले पाहिजे. हा विचार करून बरेच विद्यार्थी शिक्षण प्रवाहाच्या बाहेर पडून जीवनाचे वाटोळे करून घेतात. काही विद्यार्थी अपयश आले म्हणून आत्महत्या करून स्वतःची जीवनयात्रा संपवतात तर काही विद्यार्थी मिळेल ते काम करून आपले पोट भरतात. स्पर्धा परीक्षेत काही गुणांनी अपयश आले म्हणून बरेच विद्यार्थी नैराश्यात जाऊन स्वतःच्या जीवनाचे बरे वाईट करून घेतात. काहीजण उद्योग धंद्यात बरकत येत नाही म्हणून निराश होतात आणि धंदा बंद करून घरी बसतात. त्यांना वाटते की, पहिल्याच प्रयत्नात आपल्याला यश मिळावे. त्यांना धंद्यात आलेले अपयश पचवता येत नसल्यामुळे ते स्वतःच्या नशिबाला दोष देत बसतात. या जगात जेवढे काही महान माणसे यशस्वी होऊन मोठ्या पदावर विराजमान झालीत, त्या सर्व माणसांनी अपयश भोगूनच यशाला काबीज केलेले असते. अपयशातून वाटचाल केल्याशिवाय यशाचे सुंदर गाव गवसणे शक्य नाही, हे त्यांना माहीत असते. म्हणून ते सातत्याने संघर्ष करत राहतात, निरंतर अभ्यास करत राहतात आणि एकदोन वेळा अपयश आले म्हणून खचून न जाता उलट जिद्दीने पेटून उठतात आणि अभ्यासाला लागतात व यशाला आपल्याकडे मोठ्या हिंमतीने खेचून आणतात. मित्रांनो जीवनात यश कोणालाच सहजासहजी मिळत नाही. अपयशाच्या वाटेने प्रवास केल्याशिवाय यशाचे सुंदर ठिकाण गवसणे शक्य नाही. अपयशाचा स्वीकार न करता थेट यशाला काबीज करणारी माणसे दुर्मिळच असतात. जीवनात एक दोन वेळा अपयश आले म्हणून आपले सर्व काही संपले असे न समजता, अपयश ही यशाची पहिली पायरी असते हे ध्यानात ठेवून सातत्याने प्रयत्न करत राहून यशाला आपल्या पदरात ओढून घेणे हे आपले काम असते. आमदार, खासदार, राष्ट्रपती, पंतप्रधान, किंवा गावचा सरपंच व्हायचे म्हटल्यास पहिल्याच झटक्यात अपयश मिळेल असे नाही. कधीकधी निवडणुकीत हारल्याशिवाय विजय प्राप्त करून घेता येत नाही. लोकनेते दिवंगत विलासराव देशमुख यांना सुद्धा केंद्रीय मंत्री पदापर्यंत पोहोचण्यासाठी कित्येक वेळा अपयश सहन करावे लागले होते. ज्ञान सम्राट व ज्ञानसूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना सुद्धा निवडणुकीत पराभूत व्हावे लागले होते. तरीसुद्धा डॉ.बाबासाहेब आंबेडकर अपयशाच्या छाताडावर बसून सातत्याने संघर्ष करत राहिले आणि भारतीय संविधानाचे निर्माते व आधुनिक भारताचे राष्ट्रनिर्माते झाले. या जगात जेवढ्या काही महान हस्ती होऊन गेल्यात त्या सगळ्यांनी अपयशाला पचवून यशाला पादाक्रांत केले आहे. त्यांना अपयश आल्यावर त्यांनी नशिबाला कधीच दोष देत बसले नाहीत. उलट आनंदाने अपयशाचे स्वागत करून यशाची वाटचाल केली आहे. अपयशातून वाटचाल केल्यास यशाचे गाव गवसते, हे जरी खरे असले तरी त्यासाठी कठोर संघर्ष करावाच लागतो. दे रे हरी पलंगावरी असे म्हणून चालणार नाही. जीवनात एकदा अपयश आले म्हणून सगळे काही संपले असेही नाही. जीवनात अपयश यासाठी येते की, आपण पहिल्यापेक्षा जास्त जिद्दीने पेटून उठून संघर्ष केला पाहिजे. माणसाला अपयशाशिवाय यशाची किंमत कळणार नाही. म्हणून अपयश देखील जीवनात येणे खूप महत्त्वाचे असते. जी माणसे शेवटपर्यंत अपयश पचवतात ती माणसे नक्कीच यशाला खेचून आणतात. जीवनात अपयश यासाठी येते की, आपण स्वतःचे आत्मपरीक्षण करून स्वतःमध्ये असलेल्या उनिवा दुरुस्त करून यशाच्या मागे लागले पाहिजे. फक्त माणसांमध्ये सातत्य ठेवून संघर्ष करण्याची धमक असायला हवी. ज्या माणसाला अपयश येते तो माणूस आणखीन जोमाने पेटून उठतो आणि पुढील वाटचाल करतो. अपयशातून तावूनसुलाखून निघालेला माणूस भविष्यात यशस्वी झाल्याशिवाय राहत नाही. परंतु आजकाल अपयश आले म्हणून आत्महत्या करणाऱ्या युवकांची संख्या फार वाढली आहे. दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत किंवा स्पर्धा परीक्षेत अपयश आले म्हणून गावकरी काय म्हणतील? आईवडील, नातेवाईक व मित्रपरिवार काय म्हणेल? या भीतीने ते पूर्णपणे आतून खचून जातात आणि नैराश्याच्या खाईत जाऊन पडतात आणि स्वतःचे अनमोल जीवन एका क्षणात संपवतात. आतापर्यंतचा इतिहास असा आहे की, जीवनाच्या परीक्षेत जो कोणी अपयशी ठरलाय तोच भविष्यात यशस्वी झालाय. अपयश माणसाला नवीन काहीतरी शिकण्याची संधी घेऊन येते. एकदा जीवनात अपयश आले म्हणून माणूस संपत नसतो तर उलट जोमाने व हिंमतीने आलेल्या परिस्थितीवर व संकटावर मात करून यशाचे शिखर गाठणे हे खऱ्या माणसाचे काम असते. पालकांनी देखील आपल्या मुलांवर अपेक्षांचे ओझे टाकू नये. अपयश आले म्हणून त्यांना रागावू नये, उलट त्यांना अपयशातून यशस्वी होणाऱ्या माणसांची प्रेरणादायी कहाणी सांगून त्यांना प्रोत्साहन द्यावे. अपयशातून यशस्वी होणाऱ्या माणसांची यादी खूप मोठी आहे. जो माणूस अपयशी होतो तोच माणूस यशस्वी सुद्धा होतो. म्हणून आपण सातत्याने आपले काम करतच राहायचे, कामात अनेक अडथळे येतील, वाटेत मोठमोठे पहाड आडवे येतील पण आपण न डगमगता व धीर न सोडता त्या पहाडावर घणाचे घाव घालून त्या पहाडाला नेस्तनाबूत करण्याची ताकद आपल्या मनगटात ठेवायला हवी. अपयशातून यशस्वी होणाऱ्या माणसांच्या प्रेरणादायी कथा वाचाव्यात. त्या कथा आपल्याला नक्कीच प्रेरणा देत राहतील. थोडेफार अपयश आले म्हणून हुरळून जाऊ नका आणि अपयश आले म्हणून खचून जाऊ नका. अपयशातून वाटचाल केल्यासच यशाचे गाव गवसणार आहे हे नेहमी ध्यानात ठेवा आणि आपले काम करत रहा....

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**मो.७४९८७१५६६१**

पान १ वरुन

## व्यसनमुक्त जालनासाठी ...

सकारात्मक विचार करून पुढील काळात संयुक्तपणे काम करण्याचेही ठरविण्यात आले.

बैठकीदरम्यान अँटी नार्कोटिक्स सेलचे प्रभारी सचिन इंगेवाड आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ यांनी जिल्ह्यात अमली पदार्थांचा अवैध पुरवठा रोखण्यासाठी करण्यात आलेल्या कारवायांची माहिती दिली. अमली पदार्थांच्या तस्करीमागील उत्पादक व पुरवठादारांविरोधात कठोर कारवाई सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. या अभियानाच्या माध्यमातून जालना जिल्ह्यातील तरुण पिढीला व्यसनाच्या विळख्यातून मुक्त करून सुरक्षित आणि निरोगी समाज घडविण्यासाठी पोलीस प्रशासन, सामाजिक संस्था आणि नागरिकांनी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमास मा. अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक संदीप भारती, पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे, पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार, अँटी नार्कोटिक्स सेलचे प्रभारी सचिन इंगेवाड, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, अन्न व भेसळ विभागाचे प्रभारी श्री. जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे संजय सोनवणे, तसेच शहरातील विविध सामाजिक संस्था, डॉक्टर, मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी, व्यापारी आणि प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सामाजिक सलोखा ...

शेख निसार, शेख सोहेल, शेख तोफिक, सय्यद शाकेर , सुनील सोनवणे, खालेद मोमिन, सय्यद फिरदोस, जहीर सौदागर, सय्यद चांद आदि कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लियाकत खान यांनी केले.

## जैवविविधतेत पक्षी ...

पक्षीमित्र संघटनेचे जिल्हा समन्वयक ज्ञानेश्वर गिराम यांच्या जालना जिल्ह्यातील पक्षी वैभव या विषयावर आधारित छायाचित्राचे प्रदर्शन दाखवून जालना जिल्ह्याचे पक्षी वैभव यावर स्लाईड शो सादर केला. सर्व विद्यार्थ्यांसाठी पक्षी चित्रकला स्पर्धा घेऊन , पक्षासाठी कृत्रिम घरटे निर्मिती कार्यशाळा, प्रश्नमंजुषा, व्याख्याने इ.उपक्रम घेण्यात आले आहे. या विद्यार्थी पक्षी संमेलनाचा उद्देश असा आहे की जालना जिल्ह्यात जास्तीत जास्त विद्यार्थी पालक शिक्षक यांना पक्षी निरिक्षण आणि पक्षाबाबतीत जास्तीत जास्त माहिती होणे आणि त्या बाबतीत जनजागृती करणे हा आहे. कार्यक्रमाच्या शेवटी चित्रकला स्पर्धा, प्रश्न मंजुषा व इतर स्पर्धा मध्ये प्रथम, द्वितीय , तृतीय क्रमांक प्राप्त व सहभागी झालेल्या विद्यार्थांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

चित्रकला स्पर्धेचे मूल्यांकन कलाशिक्षक परिमल पेडगावकर व अमोल मोरे यांनी केले. पक्षी संमेलनात सहभाग नोंदवलेल्या सर्व शाळांना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन निवेदक मनिषा पाटील यांनी केले.यामध्ये जालना

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून इको क्लबच्या निवडक दोन शाळांचे प्रत्येकी १५ ते २० विद्यार्थी व प्रत्येक शाळेतून दोन शिक्षक सहभागी झाले होते. जिल्हा मास्टर ट्रेनर मधुकर गायकवाड, जालना राष्ट्रीय हरीत सेना तथा महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र संघटनेचे मयूर साबळे , जीवनराव पारे विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा महाराष्ट्र पक्षी मित्र आजीवन सभासद सुभाष पारे तसेच समस्त विभागातील वनअधिकारी, वनपाल, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# डीजी प्रवेश की सामान्य जनतेची अडवणूक? मंत्रालयाच्या दारात तासनतास खोळंबा!

**मुंबई । प्रतिनिधी -** राज्याचा कारभार चालणाऱ्या मंत्रालयात आपल्या कामासाठी येणाऱ्या जनता जनार्दनला आता डीजी प्रवेश प्रणालीच्या जाचाला सामोरे जावे लागत आहे. डिजिटल युगाच्या नावाखाली सुरू झालेली ही पास प्रणाली सामान्य नागरिकांसाठी सोयीची ठरण्याऐवजी मनस्तापाचे कारण बनली असून, एकप्रकारे जनतेच्या प्रवेशावर निर्बंधच लादले जात असल्याचा सूर उमटत आहे.

५०० किमीचा प्रवास, पण दारात ताटकळत उभे

राज्याच्या कानाकोपऱ्यातून, विशेषतः ग्रामीण भागातून नागरिक ५००-६०० किलोमीटरचा प्रवास करून आपल्या प्रलंबित कामांसाठी मंत्रालयात येतात. मात्र, मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावर आल्यानंतर त्यांना डीजी प्रवेश पाससाठी तासनतास रांगेत उभे राहावे लागत आहे. अनेकदा ''पासचे कार्ड संपले आहे'' किंवा ''सर्व्हर डाऊन आहे'' अशी कारणे देऊन नागरिकांना ताटकळत ठेवले जाते. यामुळे काम होण्याऐवजी नागरिकांच्या वाट्याला केवळ मानसिक आणि शारीरिक त्रास येत आहे.

गर्दी कमी करण्याच्या नावाखाली जनतेला मज्जाव?

मंत्रालयातील गर्दी नियंत्रित करण्यासाठी ही प्रणाली आणल्याचे सरकार सांगत असले, तरी प्रत्यक्षात सामान्य माणसाला मंत्रालयापासून दूर ठेवण्याचा हा प्रयत्न आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तांत्रिक कारणास्तव पास मिळत नसल्याने शेकडो नागरिक गेटबाहेरूनच माघारी फिरत आहेत. यामुळे ''जनता त्रस्त आणि सरकार मस्त'' अशी स्थिती निर्माण झाली आहे.





अधिवेशनात आवाज उठवण्याची गरज

सध्या राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. मंत्रालयात बसून गोरगरीब जनतेची थट्टा थांबवण्यासाठी लोकप्रतिनिधींनी या विषयावर गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. पास प्रणाली अधिक सुटसुटीत करून नागरिकांना त्वरित प्रवेश कसा मिळेल, यावर मंत्र्यांनी आणि आमदारांनी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करावा, अशी मागणी सामान्य जनतेतून होत आहे.

**ठळक मुद्दे:**

डिजिटल पासच्या नावाखाली सामान्य नागरिकांची अडवणूक.

कार्ड संपल्याचे कारण देऊन तासनतास रांगेत उभे ठेवले जाते.

दूरवरून आलेल्या नागरिकांना वेळेत प्रवेश मिळत नसल्याने मनस्ताप.

डीजी प्रवेश प्रणालीतील त्रुटी दूर करण्याची तातडीची गरज.

# आरोग्य विमाधारक केंद्रबिंदू मानून विमा कंपन्या व रुग्णालयांनी सेवा द्यावी - आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

## विमाधारकांच्या तक्रारींची शासन करणार शहानिशा

**मुंबई । प्रतिनिधी -** आरोग्य विमा कंपन्यांकडून क्लेम मंजुरीत येणाऱ्या अडचणी व रुग्णालयांची अवाजवी वैद्यकीय बिले याबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंत्रालयात, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण, खासगी विमा कंपन्या व खासगी रुग्णालये यांची संयुक्त बैठक आयोजित केली होती. रुग्ण हा केंद्रबिंदू मानून खासगी विमा कंपन्या व रुग्णालयाने सेवा द्यावी असे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी या बैठकीत दिले.



आरोग्य विमा कंपन्यांकडून क्लेम मंजुरीत येणाऱ्या अडचणी व खासगी रुग्णालयाकडून आकारली जाणारी वाजवी बिले. याबाबत आरोग्यमंत्र्यांकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने याबाबत निश्चित कार्यपध्दती निर्धारीत करण्यासाठी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंत्रालयात बैठक आयोजित केली होती. बैठकीस रिलायन्स, टाटा, एसबीआय, स्टार हेल्थ, एचडीएफसी, एआयजी, यासह राज्यातील प्रमुख विमा कंपन्या तसेच व्होकार्ड, लीलावती, जसलोक, रिलायन्स यासह राज्यातील प्रमुख रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

विमा कंपनी आणि रुग्णालय व्यावसायिक पद्धतीने काम करत असली तरी रुग्ण हा केंद्रबिंदू असला पाहिजे. आरोग्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार विमा कंपन्या, खासगी रुग्णालये, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण व आरोग्य विभागाचे प्रतिनिधी एका व्यासपिठावर येऊन रुग्ण कल्याणासाठी निश्चित कार्यपध्दती निर्धारित करण्याबाबत चर्चा झाली.

आरोग्यविमा घेणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत असुन त्यांना समाधानकारक सेवा देणे हे रुग्णालये व विमा कंपन्यांची जबाबदारी आहे. याबाबत चुकीचे निदर्शनास आल्यास शासन त्याबाबत योग्य ती कार्यवाही करेल. राज्यात मुंबई, पुणे, नागपूर सारख्या शहरात अद्यावत वैद्यकीय सेवा, तज्ञ डॉक्टर्स, व पायाभूत सुविधा उपलब्ध असल्यामुळे, मेडिकल टुरिझम व्यवसायाला मोठा वाव आहे. चांगली सेवा देऊन आपली विश्वासार्हता वाढवावी असेही आरोग्यमंत्र्यांनी सांगितले

राज्यातील सर्व रुग्णालयांनी भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण ( आयआरडीए ) च्या पोर्टलवर नोंदणी करून आवश्यक माहिती अद्ययावत ठेवावी, असे निर्देश देतानाच क्लेम मंजुरीसाठी निश्चित कालमर्यादा ठरविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. हॉस्पिटल आणि विमा कंपन्यांमधील समन्वयाच्या अभावामुळे अनेकदा रुग्णांना मानसिक तसेच आर्थिक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे रुग्णांना तात्काळ उपचार मिळावेत आणि क्लेम प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुलभ व्हावी यासाठी शासन आवश्यक ते निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.


राज्यात सध्या सुमारे सात ते आठ हजार रुग्णालये विमा सेवा देत असून काही ठिकाणी गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. अशा प्रकरणांमध्ये बॉम्बे नसिंग ॲक्ट अंतर्गत कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच मोठ्या रुग्णालयांनी उपचारांचे दर स्पष्ट करणारे दरपत्रक लावणे बंधनकारक करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. एकाच आजारासाठी विविध रुग्णालयांमध्ये वेगवेगळे दर आकारले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर स्टँडर्ड ट्रीटमेंट प्रोटोकॉल तयार करण्याची गरज बैठकीत व्यक्त करण्यात आली. तसेच विमा कंपन्या आणि रुग्णालयासाठी कॉमन 'एम्पॅनलमेंट यंत्रणा उभारण्याबाबतही विचार सुरू असल्याची माहिती आरोग्यमंत्र्यांनी दिली.

यावेळी मंजूर व नाकारलेले क्लेम आणि प्राप्त तक्रारी याबाबतची माहिती नियमितपणे आरोग्य विभागाकडे सादर करण्यास सांगण्यात आले. भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण ( ) यांचेकडुन महाराष्ट्रातील तक्रारी प्राप्त करुन त्यावर अभ्यास व उपाययोजना करण्यात येणार असुन याबाबत कार्यवाही करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरणार आहे.

वैद्यकीय व्यवसायातील विश्वासार्हता वाढविणे ही शासनाची प्राथमिकता असून कोणत्याही रुग्णाला उपचार किंवा विमा क्लेम मिळण्यात अडचण येऊ नये यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे आरोग्यमंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले. या बैठकीस आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, सहसंचालक डॉ. सुनीता गोल्हाइत तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# चंदनझीरा येथे दावत-ए-इफ्तारचे आयोजन; रोजेदारांची मोठी उपस्थिती

## इस्लामपूरा परिसरात रमजान निमित्त बंधुभावाचे वातावरण





**जालना । प्रतिनिधी -** मुस्लिम धर्मीयांचा पवित्र रमजान महिना सुरू असून या निमित्ताने चंदनझीरा येथील इस्लामपूरा परिसरात बुधवारी (दि. ११) सायंकाळी दावत-ए-इफ्तारचे आयोजन करण्यात आले. युवा उद्योजक सय्यद सलमान यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम पार पडला.

या वेळी परिसरातील रोजेदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खजूर व फळांचा आहार घेऊन रोजा इफ्तार केला. त्यानंतर सर्व रोजेदारांसाठी दावत-ए-आमचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि रमजान महिन्याच्या पवित्र वातावरणात बंधुभाव व ऐक्याचा संदेश देण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन चंदनझीरा येथील उद्योजक सय्यद हुसेन ठेकेदार यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना रमजान महिन्याचे महत्त्व सांगण्यात आले तसेच समाजात एकोपा आणि बंधुभाव जपण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इस्लामपूरा फ्रेंड्स ग्रुपच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. परिसरातील अनेक मान्यवर व नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रमजान महिन्याच्या निमित्ताने अशा सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजात एकोपा आणि सौहार्द वाढण्यास मदत होत असल्याची भावना आयोजक आणि उद्योजक सय्यद हुसेन ठेकेदार यांनी व्यक्त केली.

# घरगुती गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाची कडक कारवाई

## तपासणी पथके स्थापन करण्याचे निर्देश

**जालना । प्रतिनिधी -** घरगुती एलपीजी गॅसचा अवैध वापर व काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलण्याचे आदेश दिले आहेत. जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी सर्व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना घरगुती गॅसच्या वितरणावर लक्ष ठेवून नियमित तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

शासनाच्या निर्देशानुसार घरगुती एलपीजी गॅसच्या वापराबाबत केंद्र सरकारच्या पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयासह पीपीएसी, पीएनजीआरबी आणि पीईएसओ यांसारख्या संस्थांनी ठरवून दिलेले नियम व मार्गदर्शक तत्त्वे लागू आहेत. मात्र सध्याच्या जागतिक युध्दजन्य परिस्थितीमुळे इंधनाच्या किंमती वाढण्याची शक्यता असून, या पार्श्वभूमीवर घरगुती गॅसचा अवैध वापर आणि काळाबाजार वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याच पार्श्वभूमीवर जिल्ह्यात घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत राहावा, आणि त्याचा गैरवापर थांबवावा यासाठी विशेष उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शासन निर्णयानुसार घरगुती गॅसचा अवैध वापर रोखण्यासाठी गॅस एजन्स्यांची नियमित तपासणी करण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना घरगुती एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घेण्याचे तसेच गॅसचा अवैध वापर आढळल्यास तत्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

तपासणी दरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती किंवा व्यावसायिकांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच तालुकास्तरावर विशेष तपासणी पथके स्थापन करून, विविध ठिकाणी अचानक तपासण्या करण्यात येणार आहेत. या कारवाईबाबतचा अनुपालन अहवाल संबंधित कार्यालयाकडे सादर करण्याचे आदेश देण्यात आले असून, कोणत्याही प्रकारचा विलंब होऊ नये, याची दक्षता घेण्याचेही निर्देश जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी दिले आहेत.

# एकमेकांच्या सण-उत्सवात सहभागी होण्यामुळेच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकता आकारास येते - मुफ्ती अब्दुल रहमान

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात इफ्तार पार्टीद्वारे सामाजिक सलोख्याचा संदेश

**जालना । प्रतिनिधी -** आजच्या परिस्थितीत जिकडे तिकडे द्वेष आणि वैमनस्याचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे, अशा काळात राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय मोहब्बत की दुकान चालवत आहे, याचा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान आहे. ही केवळ इफ्तार पार्टी नसून हे राष्ट्रीय एकतेचे प्रतीक आहे. जेव्हा आपण एकमेकांच्या सण-उत्सवात, आनंदात आणि प्रार्थनेत मनापासून सहभागी होतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकता आकारास येते, असे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते मुफ्ती अब्दुल रहमान यांनी केले.

स्थानिक राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात सोमवार, दि. ९ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य इफ्तार पार्टीप्रसंगी ते प्रमुख वक्ते म्हणून मुफ्ती अब्दुल रहमान बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. नारायणराव मुंढे होते. यावेळी भगवान शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष सत्संग मुंढे, सचिव सुघोष मुंढे, प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके व उर्दू विभाग प्रमुख डॉ. आलिया कौसर पठाण यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

मुफ्ती अब्दुल रहमान पुढे म्हणाले की, राष्ट्राची प्रगती ही केवळ इमारतींनी होत नसते, तर ती इथल्या नागरिकांमधील भाईचाऱ्यामुळे होत असते. सर्व धर्मांचा पाया हा प्रेम आणि आदर हाच आहे. रोजा हा केवळ अन्न-पाणी त्यागण्याचा सराव नसून तो स्वतःवर ताबा मिळवण्याचा आणि गरिबांच्या दुःखाची जाणीव करून देणारा एक संस्कार आहे. या महाविद्यालयाने इफ्तार पार्टीचे आयोजन करून समाजात एक आदर्श निर्माण केला आहे.

अशा उपक्रमांमुळेच सर्व धर्मियांमध्ये आपुलकी वाढते आणि यातूनच एक बलशाली राष्ट्र निर्माण होईल. इथली एकता हीच देशाची खरी ताकद आहे, असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. नारायणराव मुंढे यांनी सर्वांना एकतेचा संदेश दिला. ते म्हणाले, प्रत्येक धर्माचा आदर करणे हे आपले कर्तव्य आहे. रोजाचे महत्त्व आणि त्यामागची त्यागवृत्ती सर्वांनी समजून घेतली पाहिजे. या इफ्तार पार्टीच्या निमित्ताने सर्व समाज एकत्र आला आहे, हे पाहून आनंद होतो.

सत्संग मुंढे यांनी आपल्या भाषणात मानुसकीचा विचार मांडला. ते म्हणाले, कुराण असो, गीता असो वा बायबल; या सर्व ग्रंथांचे सार एकच आहे आणि ते म्हणजे मानवाचा सन्मान. आम्ही आमच्या महाविद्यालयातून केवळ पदवीधर तरुण बाहेर पडू नयेत, तर एक चांगला माणूस बाहेर पडावा यासाठी प्रयत्नशील आहोत. सर्व धर्मांनी मानवाला आदराचे स्थान दिले आहे, तेच मूल्य जोपासण्याचे काम आम्ही करत आहोत.




इफ्तार संपल्यानंतर महाविद्यालयाच्या प्रांगणात सर्व मुस्लिम बांधवांनी नमाज अदा केली. याप्रसंगी मिर्झा अफसर बेग, इकबाल कुरेशी, फिरोज बागवान, शेख मेहमूद, बासिद कुरेशी, शेख अफसर आणि परिसरातील बहुसंख्य मुस्लिम बांधव, राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय व आश्लेषा इंग्लिश स्कूलमधील सर्व शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी या सलोख्याच्या सोहळ्यात सहभागी झाले होते. उर्दू विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. आलिया कौसर पठाण यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार लियाकत अली खान यांनी मानले

# टँकरने पाणी पुरवठा करणाऱ्या युवकाचा वीजेच्या धक्क्याने मृत्यू

## आझाद मैदान परिसरातील घटना; अचानक मोटार बिघडल्याने घडला प्रकार





**जालना । प्रतिनिधी -** शहरातील आझाद मैदान परिसरात टँकरने बिल्डींगवर पाणी चढवत असतांना वीजेचा धक्का लागून एका १८ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. करण पंडीतराव मोरे (रा. खरपुडी) असे मृत तरुणाचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, खाजगी टँकरने पाणी पुरवठा करण्याचे काम करण मोरे करत होता. आझाद मैदान परिसरातील एका कोचिंग क्लासेसच्या इमारतीवर टँकरच्या सहाय्याने पाणी बिल्डींगवरील टाकीवर चढविण्यासाठी पाईप वर चढविला व टँकरवर असलेली मोटार सुरु केली. टाकी थोडीफार भरली होती. तेवढ्यात टँकरवरील मोटार अचानक नादुरुस्त झाली. करण मोरे हा टँकरवरील मोटारीत काय बिघाड झाली हे पाहण्यासाठी जवळ गेला त्यावेळी त्याला वीजेचा शॉक लागला असल्याची माहिती प्रत्यक्षदर्शीनी दिली. तेथे उपस्थित असलेल्यांनी त्यांला तात्काळ बाजुला केले. मोटारीचा वीज पुरवठा बंद केला.

घटनेची माहिती मिळताच परिसरात नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. तरुणाच्या अचानक झालेल्या मृत्यू मुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, मृत तरुणाच्या नातेवाईकांनी घटनास्थळी या प्रकरणात जबाबदार असणाऱ्यांवर तात्काळ गुन्हा दाखल करणयची मागणी केली आहे.

या प्रकाराची माहिती मिळताच पोलीस उपविभागीय अधिकारी अनंत कुलकर्णी तसेच सदर बाजार पोलीस ठाण्याचे अधिकारी कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी पंचनामा करुन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जालना येथील शासकीय रुग्णालयात हलविला आहे. या प्रकरणी आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आल्याची माहिती आहे. सदर बाजार पोलीस घटनेचा अधिक तपास करत आहेत.

# ६ वर्षे अनाबिया मोहसीन कुरेशी आणि ८ वर्षे हसनाईन मोहसीन कुरेशीचा पहिला रोजा पूर्ण

**जालना । प्रतिनिधी -** पवित्र रमजान महिन्यात जालना शहरातील माळीपुरा जमा मस्जिद परिसरात राहणाऱ्या ६ वर्षे अनाबिया मोहसीन कुरेशी आणि ८ वर्षे हसनाईन मोहसीन कुरेशी या दोघा बहिण भावाच्या आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण करून कुटुंबियांसह परिसरातील नागरिकांचा अभिमान वाढवला आहे. एवढ्या लहान वयात दिवसभर काहीही न खाता-पिता संयमाने रोजा पूर्ण केल्यामुळे तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

रमजान महिन्यात उपवास, प्रार्थना आणि संयम यांना विशेष महत्त्व असते. सकाळी सेहरीनंतर दिवसभर अन्न व पाणी त्याग करून संध्याकाळी इफ्तारपर्यंत रोजा पाळणे हे मोठ्यांसाठीही आव्हानात्मक असते. मात्र ६ वर्षे अनाबिया मोहसीन कुरेशी आणि ८ वर्षे हसनाईन मोहसीन कुरेशी यांचा अत्यंत उत्साहाने आणि श्रद्धेने आपला पहिला रोजा पूर्ण केला. तिच्या या जिद्दीचे सर्वत्र कौतुक होत आहे. अनाबिया आणि हसनाईन मालीपुरा जामा मस्जिद परिसरातील कुरेशी सलीम नजीर पीर मोहम्मद कुरेशी यांचे दोन्ही नाती आहे. अनाबिया आणि हसनाईन मोहसीन कुरेशीचा पहिला रोजा पूर्ण केल्याबद्दल तिचे आजोबा शफी नजीर कुरेशी शवाब नजीर कुरेशी तसेच कुटुंबातील ज्येष्ठांनी तिच्यावर दुआ



आणि आशीर्वादांचा वर्षाव केला. नातेवाईक व परिसरातील नागरिकांनीही तिचे अभिनंदन करत तिच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. लहान वयात धार्मिक कर्तव्यांची जाणीव ठेवत संयम, श्रद्धा आणि आत्मविश्वासाचे दर्शन घडवणाऱ्या अनाबिया आणि हसनाईन मोहसीन कुरेशी या दोघा बहिण भावाच्या हे पाऊल इतर बालकांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. रमजान महिन्याच्या पवित्र वातावरणात अनाबिया मोहसीन कुरेशी आणि हसनाईन मोहसीन कुरेशी यांनी पहिला रोजा पूर्ण झाल्याने कुटुंबात आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण प्लेसमेंट ड्राईव्ह

## १३ मार्चला २२ जागांसाठी थेट मुलाखती

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील नोकरीच्या शोधात असलेल्या युवक-युवतींसाठी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ रोजी विशेष प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत होणाऱ्या या मोहिमेत नामांकित संस्थांमध्ये रिक्त असलेल्या २२ पदांसाठी पात्र उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना येथे घेतल्या जाणार आहेत. या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये प्रामुख्याने रेणुका देवी नागरी सहकारी बँक आणि गणपती नेत्रालय या सारख्या नामांकित संस्था सहभागी होत आहेत. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे, नियुक्ती होणाऱ्या उमेदवारांना संबंधित कंपनीकडून मिळणाऱ्या वेतनाव्यतिरिक्त शासन निर्णयानुसार त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार ६ हजार, ८ हजार आणि १० हजार रुपयांपर्यंतचे मासिक विद्यावेतन देखील दिले जाणार आहे. इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीला येण्यापूर्वी राज्य शासनाच्या .... किंवा केंद्र शासनाच्या ... या पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. लॉगिन केल्यानंतर डॅशबोर्डवरील मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना प्लेसमेंट ड्राईव्ह या टॅबवर क्लिक करून जालना जिल्ह्याची निवड करावी आणि संबंधित पदांची माहिती घ्यावी. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# ग्रामीण भागातील महिलांनी छोट्या उद्योगांच्या माध्यमातून आत्मनिर्भर व्हावे -जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** ग्रामीण भागातील महिलांनी स्वयंसहायता समूहांच्या माध्यमातून छोटे-छोटे उद्योग उभारून आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि आत्मनिर्भर बनावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जालना शहरातील डॉ. फ्रेझर बॉईज हायस्कूल येथे दि. ७ मार्च ते ११ मार्च २०२६ या कालावधीत ग्राम विकास विभाग व पंचायत राज विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद जालना उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ग्रामीण स्वयंसहायता समूहांच्या महिलांनी तयार केलेल्या दर्जेदार व पारंपरिक उत्पादनांची भव्य प्रदर्शनी व विक्री शिबिर जानकी महोत्सव आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनीला भेट देऊन पाहणी करताना त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना पी. एम. मिन्नू, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सुनिल कुमार पठारे, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग श्रीमती स्मिता पवार, कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद जालना श्रीमती सविता शालघर, उप जिल्हाधिकारी सामान्य प्रशासन श्रीमती नम्रता चाटे, उप जिल्हाधिकारी पुनर्वसन श्रीमती सुकेशिनी कांबळे-पगारे, उप जिल्हाधिकारी रोहयो श्रीमती मनिषा दांडगे, उप जिल्हाधिकारी भूसंपादन श्रीमती मनिषा देशपांडे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बाल विकास विभाग श्रीमती कोमल कोरे, तहसीलदार श्रीमती छाया पवार, गटविकास अधिकारी बदनापूर श्रीमती ज्योती राठोड, गटविकास अधिकारी अंबड श्रीमती ज्योती कवडदेवी, शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती संगिता भागवत, जिल्हा अभियान व्यवस्थापक शैलेश चौधरी यांची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, ग्रामीण भागातील महिलांकडे अनेक कौशल्ये व पारंपरिक ज्ञान आहे. या कौशल्यांचा उपयोग करून विविध लघुउद्योग उभारता येतात. स्वयंसहायता समूहांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक स्वावलंबन मिळू शकते. महिलांनी घरगुती व्यवसाय, हस्तकला, अन्नप्रक्रिया, शिवणकाम, तसेच स्थानिक पातळीवर उपलब्ध संसाधनांवर आधारित उद्योग सुरू करून स्वतःचा व कुटुंबाचा आर्थिक विकास साधावा. सोबतच




महिला सक्षमीकरणासाठी महिलांनी आधुनिक तंत्रज्ञान अवगत करणे आवश्यक आहे. डिजिटल माध्यमांचा वापर करून उत्पादनांची विक्री वाढवता येते. तसेच बाजारपेठेची माहिती घेऊन उत्पादनांची गुणवत्ता टिकवून ठेवणे महत्त्वाचे आहे. नवीन उद्योगांविषयी माहिती घेऊन ते उभारण्यासाठी महिलांनी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.या प्रदर्शनीत ग्रामीण स्वयंसहायता समूहांच्या महिलांनी तयार केलेले विविध खाद्यपदार्थ, मसाले, पापड, लोणची, हस्तकला वस्तू, सजावटीच्या वस्तू, कपड्यांवरील भरतकाम आदी पारंपरिक व दर्जे दार उत्पादने विक्रीसाठी ठेवण्यात आली होती. नागरिकांनी या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध वस्तूंची खरेदी केली. या वेळी संबंधित विभागाचे अधिकारी, स्वयंसहायता समूहांच्या महिला तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रदर्शनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना आपली उत्पादने थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याची संधी मिळाली असून त्यांच्या आर्थिक सबलीकरणाला चालना मिळणार आहे.

# राज्यस्तरीय पॉझिटिव्ह जर्नालिझम पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सवने व डॉ. भारूका यांचा सत्कार



**परतूर । प्रतिनिधी -** देशातील पत्रकारांची सर्वात मोठी संघटना असलेल्या 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या वतीने दिला जाणारा अत्यंत प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पॉझिटिव्ह जर्नालिझम पुरस्कार जाहीर झाला असून, यामध्ये मराठवाडा विभागातून परतूरचे पत्रकार भारत सवणे यांची निवड करण्यात आली आहे. सकारात्मक पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा ध्यास घेतल्याबद्दल पत्रकार भारत सवने यांना हा बहुमान मिळाला असून, या निवडीमुळे जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्याबद्दल भारत सवने यांचा व नुकत्याच डॉक्टर पदवी मिळवल्याबद्दल डॉ. साक्षी भारूका यांचा व्हॉइस ऑफ मिडिया च्या पत्रकारांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

समाजात नकारात्मकतेचे सावट असताना केवळ समस्यांवर बोट न ठेवता, त्यातून मार्ग काढणाऱ्या आणि सकारात्मक ऊर्जा देणाऱ्या बातम्यांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या वतीने हा विशेष पुरस्कार दिला जातो. पत्रकार भारत सवणे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या लेखणीच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे प्रश्न मांडतानाच, प्रशासकीय पातळीवर सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत. त्यांच्या याच कार्याची दखल राज्य स्तरावर घेतली गेल्याने सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

या पुरस्काराचे वितरण १५ मार्च २०२६ रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण (वाय. बी. चव्हाण) सेंटर येथे एका भव्य सोहळ्यात होणार आहे. या कार्यक्रमाला राजस्थानचे राज्यपाल मा. हरिभाऊ बागडे, महाराष्ट्र राज्याचे मंत्री मा. मंगलप्रसाद लोढा, श्रीमती अमृता फडणवीस यांच्यासह राज्यातील राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

परतूर सारख्या ग्रामीण भागातून येऊन राज्य पातळीवर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या पत्रकार भारत सवणे यांच्या या यशाबद्दल जालना जिल्ह्यातील पत्रकार, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या सत्कार समारंभाला व्हॉईस ऑफ मिडिया चे अध्यक्ष भाऊसाहेब पाटील मुके, सचिव मुमताज अन्सारी, प्रवक्ते अर्जुन पाडेवार, माजी अध्यक्ष, अजय देसाई यांच्यासह जेष्ठ पत्रकार राजकुमार भारूका, केदार शर्मा, माणिक जैस्वाल, संजय देशमाने, कैलास सोळंके, सरफराज नाईकवाडी, अशोक ठोके, प्रा. शरद बोराडे, राज भडर्गे, तारेख शेख, सचिन खरात व लक्ष्मण बिल्हारे व जेष्ठ नागरिक भास्करराव चव्हाण आदी उपस्थित होते.

## दोन दिवसीय जालना ग्रंथोत्सव उत्साहात

# लोकसेवेचे ध्येय आणि मूलभूत संकल्पनांचे ज्ञान यशासाठी आवश्यक - उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे

## जालना ग्रंथोत्सव २०२५; 'मी धर्मवीर' नाटिकेने शिवकालीन इतिहास जिवंत

**जालना । प्रतिनिधी -** स्पर्धा परीक्षेच्या प्रवासात निस्वार्थी वृत्ती आणि कार्यक्षमता हेच यशाचे खरे गमक आहे. केवळ शासकीय नोकरी मिळविण्याच्या उद्देशाने नाही, तर गावाचा विकास आणि जनतेची सेवा करण्यासाठी अधिकारी होण्याचे ध्येय बाळगावे. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना केवळ पुस्तकी वाचन न करता विषयांच्या मूलभूत संकल्पना समजून घेण्यावर भर देणे आवश्यक आहे. जोपर्यंत विषयातील संकल्पना स्पष्ट होत नाही, तोपर्यंत केवळ पाठांतराचा उपयोग होत नाही. पाया भक्कम असेल तर यश हमखास मिळते. त्यामुळे स्पर्धा परीक्षेतील अभ्यासाची सुरुवात नेहमी मूलभूत संकल्पनेपासून करा. तरी स्पर्धा परीक्षेत लोकसेवेचे ध्येये आणि मूलभूत संकल्पनांचे ज्ञान यश प्राप्तीसाठी अत्यंत आवश्यक आहे. असे प्रतिपादन उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी केले.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात 'जालना ग्रंथोत्सव-२०२५' आयोजित करण्यात आला आहे. बुधवार दि. ११ मार्च रोजी या ग्रंथोत्सवात 'स्पर्धा परीक्षा काळाची गरज' या विषयावर आयोजित परिसंवादात त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष रवींद्र तौर होते. तर डॉ. संजीवनी तडेगावकर, डॉ. प्रभाकर शेळके, प्रा.राजेंद्र भोसले, उपशिक्षणाधिकारी संजय कायंदे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी चंद्रशेखर ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती.






समाजासाठी आणि देशासाठी काम करण्याची ओढ ज्याच्या मनात आहे, तोच एक उत्तम अधिकारी बनू शकतो. एक अधिकारी म्हणून आपण घेतलेल्या निर्णयाचा समाजावर काय दूरगामी परिणाम होईल, याचे भान असणे अत्यंत आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षेचे क्षेत्र आव्हानात्मक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नेहमी सकारात्मक राहून तयारी करावी, मात्र त्याच वेळी आपल्याकडे 'प्लॅन बी' सुद्धा तयार असावा. यश मिळाले नाही तरी निराश न होता, पर्यायी मार्गाचा विचार करून जिद्दीने पुढे जावे. प्रशासनात येताना तुमची वृत्ती ही केवळ नोकरीची नसून ती सेवा करण्याची असावी. एक अधिकारी म्हणून आपण घेतलेल्या निर्णयाचा समाजावर काय दूरगामी परिणाम होईल, याचे भान असणे अत्यंत आवश्यक आहे. प्रशासनात येताना तुमची वृत्ती ही केवळ नोकरीची नसून ती सेवा करण्याची असावी. स्पर्धा परीक्षेत सर्व विषयांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. केवळ पुस्तकी कीडा न होता, चालू घडामोडींचे सखोल ज्ञान आत्मसात करावे. असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांची समयोचित भाषणे झाली. सुत्रसंचालन डॉ. प्रभाकर शेळके यांनी केले तर आभार सतीश जाधव यांनी मानले. यावेळी ग्रंथप्रेमी, ग्रंथालयाचे संचालक, ग्रंथपाल, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**मी धर्मवीर नाटिकेने शिवकालीन इतिहास जिवंत**

ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या सत्रात दुपारी १.३० वाजता 'मी धर्मवीर' या नाटिकेचे ओजस्वी सादरीकरण करण्यात आले. ऐतिहासिक काळात झालेला अन्याय आणि जुलूम याविरुद्ध छत्रपती शिवाजी महाराज यांनी दिलेला लढा यात प्रभावीपणे मांडण्यात आला. रायरेश्वर मंदिरातील स्वराज्याची शपथ आणि आग्रा भेटीतील थरार पाहून उपस्थित प्रेक्षक भारावून गेले. या नाटिकेने संपूर्ण सभागृहात चैतन्य निर्माण केले होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.